International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.6 No.1 Sept – Oct 2018

# स्वातंत्र्योत्तर काळातील कोल्हापूर जिल्ह्यातील दलित संघटन व आंदोलने

**श्री. गौतम हरी आळतेकर**
सहयोगी प्राध्यापक, श्री शिव–शाहू महाविद्यालय,
सरूड, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

कोल्हापूर जिल्ह्याच्या दलित चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. कोल्हापूर जिल्ह्यातील दलित चळवळीचे कार्यकर्ते व अध्यक्ष गंगाराम यमाजी कांबळे, दत्तोबा संतराम पोवार, तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य, गंगाधर यशवंत पोळ, मा. ता. मोरे, आबा सुबू गवळी, पंजाबराव ईश्वरा हुलस्वार, गणपत बापूजी पोवार, ज्ञानदेव शिवाजी खोचीकर, दलितमित्र मा. ई. कुरणे, रतन कांबळे, दा. म. शिर्के (आमदार), खासदार एस. के. डिगे, बंडोपंत ठिकपुर्ले, बाबुराव परितेकर, रंगराम मांडरे, रंगराव सावर्डेकर, आर. बी. कोसंबी, प्रकाश हुलस्वार, दत्ता जाधव, प्रज्ञावंत गौतम, बाबासाहेब वडगावकर, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. विनय कांबळे, प्रा. भरत नाईक, प्रा. शहाजी कांबळे, प्रा. विश्वासराव देशमुख, उत्तमदादाकांबळे, मंगलराव माळगे, रुपाताई वायदंडे, अॅड. पंडीतराव सडोलीकर, अॅड. डी. एस. कांबळे इत्यादी दलित कार्यकर्ते व नेते स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर कोल्हापूर संस्थानात व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दलित चळवळीच्या व आंदोलनाच्या माध्यमातून कोल्हापूरच्या दलित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होते, त्यांच्यामध्ये जाणीव व जागृती ही निर्माण करत होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गाने जाण्यासाठी प्रोत्साहन देत होते.

१९२० च्या माणगाव परिषदेपासून ते ६ डिसेंबर १९५६ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कोल्हापूरचे दलित कार्यकर्ते आणि नेते यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. त्यामुळे स्वातंत्र्याच्या पूर्वी व स्वातंत्र्यानंतर कोल्हापूरची दलित मंडळी डॉ. बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपली सामाजिक व राजकीय चळवळ करून कोल्हापूरच्या दलित जनतेला सामाजिक, राजकीय हक्क व अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न करीत होते. इ. स. १९५० ला भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्त्वाखाली डॉ. आंबेडकर हयात असताना कोल्हापूरातील बिंदू चौकात त्यांचा पुतळा बसवून कोल्हापूरकर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यावर किती प्रेम करतात हे दाखवून दिले. डॉ. आंबेडकरांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची शाखा कोल्हापूरात कार्यरत होती. यामध्ये खासदार एस. के. डिगे, शांताराम नाईक, बळवंत शिंगे, गंगाराम कांबळे, गणपत पोवार, पांडुरंग लकडे, मा. ई. कुरणे, आमदार दादासाहेब शिर्के हे सर्वजण कोल्हापूरची सामाजिक व राजकीय चळवळ करत होते

याठिकाणी स्वातंत्र्योत्तर कोल्हापूर जिल्ह्यातील दलित संघटनांचा विचार करु. त्यानंतर, त्यांनी हाताळलेल्या विविध आंदोलनांचा विचार करु.

## १. दलित संघटन :

**शेडयुल्ड कास्ट फेडरेशन (शे. का. फे.):** ही संघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयातीत असतानाच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये स्थापन झालेली होती. तिचे काम कोल्हापूर

जिल्ह्यामध्ये जोरात सुरू होते. फेडरेशनने आपल्या कार्यकालावधीमध्ये विविध बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये जे ठराव पास करण्यात आले, त्या ठरावांवरुन, कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांमधील राजकीय जागृतीही आणि दिशाही आपल्याला दिसून येते.

***कुरुंदवाडची बैठक (*** १४ फेब्रुवारी १९५४): या बैठकीमध्ये पुढील ठराव पास करण्यात आले, जसे,(१) मराठवाडा जमीन सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र दलित फेडरेशनचे अध्यक्ष कर्मवीर दादासाहेब गायकवाड व मराठवाडा दलित फेडरेशनचे अध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी जो अतुलनिय स्वार्थत्याग केला व चिकाटी दाखविली याबद्दल ही परिषद त्यांचे हार्दिक अ नंदन करत आहे. (२) कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थान मंडळाची व्यवस्था लोकनियुक्त मंडळाकडून काढून घेवून ती सरकार नियुक्त मंडळाकडे देवून सरकारने लोकशाहीस बगल दिली आहे. त्यामुळे परिषदेस दिलगिरी वाटते. (३) कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती महाराज शहाजीराजे यांचेकडून सरकारने साडेबारा हजार एकर जमीन आपल्या ताब्यात घेतली आहे. या जमीनीचे वाटप करतेवेळी अस्पृश्य समाजाचा प्रथम विचार व्हावा. (४) सरकारच्या मालकी हक्कांच्या पडजमीनी सरकाने दलितांना द्याव्यात. अस्पृश्य समाजाच्या वसाहतींच्या अडचणी लक्षात घेवून सरकारने सरकारी जमिनी देवून हा प्रश्न निकाली काढावा व सरकार दरबारी वसाहतीच्या संदर्भात जी प्रकरणे आहेत. ती ताबडतोब सोडवावीत. सरकारी व निमसरकारी सेवेमध्ये अस्पृश्यांची भरती विना विलंब सरकारने करावी.

याचप्रमाणे***कागलची बैठक (*** दि. २८ मार्च १९५४), ***हातकणंगलेची बैठक(***दि. १२ मे १९५४), ***गडहिंग्लजची बैठक*** इ. बैठकामधून दलित संघटन वाढत गेले.

१९५७ मध्ये भारतात दुसरी सावत्रिक निवडणूक जाहीर झाली. सहाजिकच राष्ट्रीय पातळीवर दलित नेत्यांनी शे. का. फे. च्या नावाखालीच या निवडणुका लढविण्याचे ठरविले. यावेळी शे. का. फे. ने. संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर युती केली होती. शे. का. फे. च्या तर्फे खासदार पदासठी एस. के. डिगे व आमदारपदांसाठी दा. म. शिर्के यांना तिकिट देण्यात आले. दि. २५ मार्च १९५७ रोजी निवडणुकीचा निकाल लागून शे. का. फे. चे दोन्हीही उमेदवार विजयी घोषित केले. हे कोल्हापूर जिल्ह्यातील दलित कार्यकर्त्यांचे फार मोठे यश होते.

अशा पद्धतीने कोल्हापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी इ. स. १९५२ ते इ. स. १९५७ या काळात शे. का. फे. च्या बैठका/परिषदा आयोजित केल्या होत्या. शे.का. फे. हा पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला होता. त्यामुळे हा पक्ष कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कार्यरत ठेवण्याचे कार्य दलित पुढाऱ्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले. परिषदा, व्याख्याने, भाषणे, मेळावे, बैठका इत्यादींच्या माध्यमातून दलित समाज, आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या प्रगत व्हावा, दलित समाजास संघटनेचे महत्त्व समजावे, संघटीत राहूनच दलित समाजाचा बदल घडवून आणता येतो हे लोकांना समजून देणे ही कार्य शे. का. फे. हा पक्ष कोल्हापूर जिल्ह्यात करत होता. या पक्षाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पोहचविणे हे होय. हे कार्य कोल्हापूर जिल्ह्यातील नेते व कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने व निस्वार्थीपणे करत होते.

**रिपब्लिकन पार्टीची स्थापना—फूट आणि कोल्हापूर जिल्हा**:इ.स. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शे. का. फे. ला फार मोठे अपयश आले होते. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर हा पक्ष निराशावादी बनला होता. या काळापासूनच दलित समाज इतर राजकीय पक्षांकडे आकृष्ट होत चाललेला होता. संयुक्त मतदार संघाची निर्मिती झाल्यामुळे दलित समाजातील मंडळी शे. का. फे. मध्ये न राहता काँग्रेस पक्षाकडे जाऊन निवडून येत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांना शे. का. फे. हा पक्ष बरखास्त करून त्या जागी नवीन

सर्वसमावेशक असा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना करावी, असे वाटत होते. परंतु त्यांचे हे स्पप्न पूर्ण होण्याअगोदरच त्यांचे ६ डिसेंबर १९५६ ला महानिर्वाण झाले. त्यामुळे त्यांना नवीन पक्षाची स्थापना करता आली नाही.

तरीहीदि. ३ ऑक्टोबर १९५७ रोजी नागपूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहकाऱ्यांनी रिपब्लिकन पक्षाची रितसर स्थापना केली. मद्रासचे एन शिवराज यांची अध्यक्ष म्हणून, उपाध्यक्ष म्हणून हरदास आवळे यांची तर सेक्रेटरी म्हणून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांची निवड झाली. अशा पद्धतीने आता रिपब्लिक पक्षाच्या कार्याला वाटचालीला सुरवात झाली. पक्षाची स्थापना झाल्यानंतर हा पक्ष फक्त दोन वर्ष एकसंघ होता. या काळामध्ये पक्षातर्फे केंद्रिय पातळीवर चांगले काम झाले. पण दोन वर्षानंतर सहकाऱ्यांतील कुरबूर, संदोपसुंदी व स्वार्थी वृती उफाळून येवून प्रथम दुरूस्त व नादुरूस्त असे पक्षामध्ये दोन गट पडले. पुढे यामध्ये शकले होवून गायकवाड गट, कांबळे गट, खोब्रागडे गट, भंडारे गट, गवई गट असे गट पडले. हे गट पुढे राज्यात तसेच कोल्हापूर जिल्ह्यातही पडत गेले. आज या पक्षाचे आठवले गट, आंबेडकर गट, कवाडे गट, गवई गट, खोब्रागडे गट अशा गटामध्ये विभागणी झाली आहे. इ. स. १९५७ ला स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षामध्ये पुढे जी फूट पडली त्याचा परिणाम महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यावार झाला. याला कोल्हापूर जिल्हाही अपवाद नव्हता.

***दलित पॅंथर—फूट आणि कोल्हापूर जिल्हा:*** रिपब्लिकन पक्षातील फूटीमूळे पूर्वी एकत्र काम करणारी दलित नेते व कार्यकर्ते गटा—तटामध्ये विभागले गेले. याचा महाराष्ट्रातील जातीयवाद्यांनी फायदा घेवून ते दलितांच्यावर गावोगावी तुटून पडू लागले. अन्याय, अत्याचार करू लागले. दलित आया—बहिणींची अब्रु लूटू लागले. म्हणूनच याला आता एकच उत्तर होते. ते म्हणजे प्रतिकार म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने उत्तेजीत झालेल्या महाराष्ट्रातील शिक्षीत तरुणांनी इ. स. १९७२ ला एकत्र येवून एका लढाऊ संघटनेची स्थापना केली आणि ती लढाऊ संघटना म्हणजे 'दलित पँथर' होय. इ. स. जुलै १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना राजा ढाले, नामदेव ढसाळ यांनी केली. हा दलित पँथरचा झंझावात कोल्हापूरातही पोहचला. इ. स. १९७३ मध्ये हुतात्मा गार्डनमध्ये बाबुराव परितेकर, रंगराव मांडरे, रंगराव सावर्डेकर, प्रकाश हुलस्वार, आर. बी. कोसंबी, दत्ता जाधव, सुधाकर कांबळे, सुदाम चौगुले, एस. बी. दोनवडेकर, शंकर आवळे इ. दलित कार्यकर्त्यांनी सभा घेवून कोल्हापूरात दलित पँथरची शाखा सुरू केली. पहिले अध्यक्ष म्हणून दत्ता जाधव यांची निवड केली. दलित पँथरचे संस्थापक नेते राजा ढाले हे फार प्रक्षोभक भाषण करतात म्हणून सरकारने त्यांच्या भाषणावर बंदी घातली होती, असे असूनही राजा ढालेंचा महाराष्ट्रभर झंझावात सुरूच होता. यातूनच कोल्हापूरच्या शाखेने १९७४ मध्ये राजा ढालेंना कोल्हापूरचे निमंत्रण दिले. राजा ढाल्यांनी ते स्वीकारले व कोल्हापूरला आले. यावेळी पोलिसांकडून सभाबंदीचा आदेश जाहीर झाला होता. रेल्वे स्टेशनवर राजा ढालेंचे जोरात स्वागत करण्यात आले. दुसऱ्या दिवशी राजारामपुरी, सदर बाझार, फिरंगाई वसाहत व सिद्धार्थनगर येथे त्यांच्या जंगी सभा झाल्या. साऱ्या तरुणांच्या अंगामध्ये रक्त सळसळू लागले व ते प्रतिकाराच्या दिशेने चेतवू लागले. राजा ढाल्यांची मिरवणूकही कोल्हापूरात काढण्यात आली होती.

अशा पद्धतीने सर्व महाराष्ट्रभर दलित तरुण अन्यायाच्या विरोधी एकत्र होत असतानाच पुन्हा रिपब्लिकन पक्षाप्रमाणेच दलित पँथरमध्येही नेतृत्वावरून संघर्ष उफाळून आला व राजा ढालेंनी दलित पँथरपासून फारकत घेवून 'मास मुव्हमेंट' सुरू केली. कोल्हापूर जिल्ह्यात ही मास मुव्हमेंटची शाखा सुरू होऊन आर. बी. कोसंबीच्या नेतृत्वाखाली सुदाम नागावकर, विठ्ठल कांबळे, तुकाराम कांबळे इत्यादी दलित तरुण काम करू लागले.

अशा प्रकारे 'दलित पँथर', 'मास मुव्हमेंट' या सामाजिक संघटना कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत होत्या. यामध्ये पुढे दलित मुक्तीसेना, दलित महासंघ व भारतीय दलित पँथर अशा सामाजिक संघटनांचा सुळसुळाट झाला. कोल्हापूरातील सामाजिक बदलाच्या क्षेत्रात काम करणारे सर्व नेते, कार्यकर्ते विभागले गेले. असे असले तरी हुपरीचा संघर्ष, बेलवल्याचा संघर्ष, घोटवडेचा संघर्ष आणि परवाच २००५ चा वडिंग्याचा संघर्ष या सर्व संघर्षाच्या वेळी सामाजिक बदलासाठी गटा—गटात विखुरलेली दलित कार्यकर्ते व दलित नेते कोल्हापूर जिल्हयामध्ये एकत्र येवून संघर्ष करु लागले. त्यामुळे अन्याय करणाऱ्या समाजावर व शासनावर दलित संघटनांचा दबदबा निर्माण झाला. आज कोल्हापूरात बऱ्याच कमी प्रमाणात सरळ दलितांच्यावर अन्याय व अत्याचाराचे प्रमाण कमी झाले आहे. याचा अर्थ स्पृश्य हिंदूच्या डोक्यातून अस्पृश्यता गेली आहे, असे मुळीच नाही. ती अजूनही प्रत्येक उच्चवर्णियांच्या मनामध्ये आहेच. जातीय व धर्मवाद कोल्हापूरसारखा शाहू महाराजांच्या नगरामध्ये खचाखच भरला आहे. शहरापेक्षा खेड्यामध्ये याचे प्रमाण जास्त आहे. हे आपल्याला पुढील आंदोलनांवरुन लक्षात येईल.

**२. आंदोलने :**

**पुलाची शिरोली पाणी प्रकरण (१९७३):**

१९७० नंतर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दलित चळवळीमध्ये दुसऱ्या पिढीतील कार्यकर्त्यांचा व नेत्यांचा उदय झाला होता. ही दुसरी पिढी भारतीय राज्यघटनेने दिलेल्या हक्क व अधिकाराने तयार झाली होती. त्यांना मानवजातीचे सर्व हक्क व अधिकार भारतातील दलितांना मिळाले पाहिजेत, अशी त्यांची मागणी होती. याच दरम्यान महाराष्ट्रामध्ये दलित शिक्षित तरुणांनी दलित पँथरची स्थापना करून आपल्यावरील अन्याय, अत्याचाराचा विरोधी प्रतिकार करण्यास तयार झाली होती. याच वेळीस १९७३ ला पुलाची शिरोली ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे पिण्याच्या पाण्यावरून दलित—सवर्ण संघर्षांचा भडका उडाला. पुलाच्या शिरोलीमध्ये दलितांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. गावच्या दलित तरुणांनी शेवटी धाडसाने गावतळ्यावर पाणी भरले. ही बातमी सवर्णांना समजताच मोठा गहजब निर्माण झाला. दलितांनी आपल्या पायरीने वागले पाहिजे, असे सवर्ण म्हणू लागले. तसेच काही समाजकंटकांनी दलितांनी तलाव बाटवला म्हटल्यावर तलावामध्ये मृत जनावर टाकून दिले. ही गोष्ट जेव्हा नवीनच स्थापन झालेल्या दलित पँथरला समजली तेव्हा दत्ता जाधवांच्या नेतृत्वामध्ये आर. बी. कोसंबी, बाबुराव परितेकर, प्रकाश हुलस्वार या मंडळींनी पुलाच्या शिरोलीला भेट दिली. गावात मोठा पोलिस बंदोबस्त होता. सवर्णांना आता आंबेडकरी हिसका दाखवायचाच असा चंग दलित पँथरने बांधून कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर या संदर्भात मोठा मोर्चा आयोजित केला. मोर्चाचे नेतृत्व मा. ई. कुरणे, रतन कांबळे, दत्ता जाधव, आर. बी. कोसंबी इ. नेत्यांनी केली. यावेळी एक निवेदन तयार करून जिल्हाधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करून दलितांच्यासाठी गावतळे मुक्त केले. नवीन उदयास आलेल्या दलित पँथरच्या चळवळीला फार मोठे यश मिळाले. आता जिल्हयातील अनेक गावामध्ये आपल्या हक्क व अधिकारासाठी पॅथरने संघर्षाचे रणशिंग फुंकले. तक्रार दाखल केली. आर. बी. कोसंबीसरांनी जिल्हाधिकारी डी. टी. जोसेफ, जिल्हा पोलिस प्रमुख राजवाडेसाहेब यांना शिष्ट मंडळासह भेटून विनंती अर्ज दिला व या गोष्टींकडे लक्ष देण्याची विनंती केली.

**जैताळ गावातील संघर्ष (१९७८—८४):**

कोल्हापूर जिल्ह्यातील करवीन तालुक्यातील जैताळ हे डोंगर कपारीतील गाव. गावची लोकसंख्या दिड हजार पर्यंत. यामध्ये छोटासा दलित समाज व उर्वरीत मराठा समाज आहे.

शेती पावसावरच अवलंबून असल्यामुळे एकच पीक लोक घेत होती. दलित समाजातील लोक आजूबाजूच्या गावामध्ये मोलमजुरीसाठी जात होते. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे येथील दलित समाज सवर्णांची गुलामगिरी करण्यामध्येच धन्यता मानत होता. जैताळच्या दलित समाजामध्ये जागृती करण्याचे काम विठ्ठल कांबळेनी केले. ते जैताळचे जावई होते. विठ्ठल कांबळेंनी जैताळच्या तरुण मुलांना शाळा/कॉलेजबरोबरच स्वाभीमान शिकविला. दलित पँथर व मास मुव्हमेंट या संघटना आपल्यासाठी काय करत आहेत हे शिकविले. पुढे शिकलेल्या दलित मुलांनी गावकीची कामे करणे बंद केले. त्यामुळे सवर्ण मंडळी वृद्ध दलितांना बोलावून त्रास देवू लागली. हळूहळू जैताळच्या सवर्ण मंडळींनी दलितांच्यावर बहिष्काराचे अस्त्र उगारले. कांबळे व इतर कार्यकर्ते आर. बी. कोसंबीकडे वारंवार येत होते व आपली कैफीयत मांडत होते. हळूहळू जैताळच्या दलितांचा प्रश्न बिकट बनत होता. दलित मंडळी सर्व हादरून गेली होती. गावच्या सवर्ण मंडळींना आमदारांचा जबरदस्त पाठिंबा होता. दलितांना भयमुक्त करणेसाठी मास मुव्हमेंटच्या कार्यकर्त्यांनी जैताळमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आयोजित केली. यामध्ये जैताळच्या दलित समाज, मास मुव्हमेंटचे कार्यकर्ते व पोलिस प्रमुख सामिल झाले कार्यक्रम पार पडला पण; जैताळच्या दलित समाजाचा प्रश्न गंभीरच बनत गेला. १९७८ ते १९८४ पर्यंत जैताळमध्ये दलित—संघर्ष सुरू होता. जैताळच्या संघर्षामधील दिलिप कांबळे हा मुख्य होता. त्याला पंधरा—वीस जणांच्या समूहाने काठ्यांनी मारले. तो मेला आहे, अशी खात्री झाल्यानंतर ते पळून गेले. पण दिलीप कांबळे बेशुद्ध होता. त्याला कोल्हापूरच्या सरकारी दवाखान्यात अ‍ॅडमिट केले. हळूहळू त्याची तब्येत सुधारू लागली. आमदारांचा पाठिंबा जैताळच्या सवर्णांना असल्यामुळे ते पाठीमागे हटत नव्हते. शेवटी आर. बी. कोसंबी, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, प्रा. विनय कांबळे, प्रा. जी. बी. अंबपकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व पोलिस महासंचालकांना यामध्ये लक्ष घालण्यासाठी तारा केल्या. शेवटी मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तंबी दिल्यानंतर जिल्हाधिकारी व पोलिस प्रमुखांनी यामध्ये लक्ष घातले. जैताळच्या दलितांच्या सुरक्षेबाबत आमदार श्रीपतराव बोंद्रेंनी स्टॅम्पपेपवर लिहून दिले आणि जवळ—जवळ पाच वर्षे चालू असलेल्या जैताळमधील दलित —सवर्ण संघर्ष मिटविण्यामध्ये यश आले. यामध्ये मास मुव्हमेंटच्या आर. बी. कोसंबी व इतरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तर जैताळचे दलित गुलामगिरीची कामे करण्याचे बंद करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या मार्गाने जावू लागले. आज जैताळची दलित मंडळी उच्च शिक्षण घेत आहेत. प्राध्यापक, शिक्षक, कारकून व अधिकारी सुद्धा झाले आहेत. दोन्ही समाजामध्ये शिक्षणामुळे परिवर्तन झाले आहे. दलित व सवर्ण एकमेकांबरोबर मिळून मिसळून वागत आहेत.

**हुपरीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा विटंबना प्रकरण (१९८०):**

हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर हे गाव जसे चांदीच्या व्यवसायाने सर्वांच्या परिचयाचे झाले तसेच ते स्वातंत्र्यानंतर आंबेडकरी चळवळीचे व जागृतीचे एक केंद्र म्हणून ही महाराष्ट्रामध्ये ओळखू लागले. अर्थातच याचे संपूर्ण श्रेय हे रिपब्लिकन पक्षाच्या पहिल्या फळीतील व दुसऱ्या फळीतील नेते म्हणजे अनुक्रमे रतन कांबळे व मंगलराव माळगे यांना जाते. रतन कांबळेंनी मा. ई. कुरणे, बी. डी. ठिकपुर्ले व इतर कार्यकर्त्यांच्या माध्यमातून स्वातंत्र्यानंतर आंबेडकरी चळवळीच्याबाबत सारा कोल्हापूर जिल्हा ढवळून काढला होता. माणगावनंतर आंबेडकरी चळवळीच्याबाबत हुपरीचा नंबर लागतो. हुपरीमध्ये डॉ. बाबासाहेबांचा पुतळाही बसविला होता व त्यांचे विचार पुतळ्याच्या माध्यमातून जीवंत ठेवले होते. मात्र १९८० साली हे हुपरीच्या दलितांच्यादृष्टीने फारच संघर्षाचे उजाडले. हुपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची कोणीतरी अज्ञाताने विटंबना केली. बातमी हा हा

म्हणता साऱ्या जिल्हाभर व महाराष्ट्रभर पसरली. निळेध्वज घेऊन दलितांचे जथ्थेच्या जथ्थे हुपरीकडे येऊ लागले व घडलेल्या घटनेचा धिक्कार करू लागले. आता सर्व आर. पी. आय. गटाचे कार्यकर्ते, मासमुव्हमेंट व इतर संघटनांनी मिटिंग घेऊन पुतळा विटंबनामध्ये समाजकंटक सामील आहेत त्यांना ताबडतोब अटक करावी व शिक्षा द्यावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर एक भव्य मोर्चा काढण्याचे नियोजन केले. या मोर्चाचे नेतृत्त्व मा. ई. कुरणे, रतन कांबळे, बी. डी. ठिकपुर्ले, आर. बी. कोसंबी, दत्ता जाधव, बाबासाहेब वडगावकर, प्रकाश हुलस्वार या मंडळींनी केले. सुमारे दहा हजारांचा जमाव या मोर्चासाठी साऱ्या जिल्ह्यातून जमला होता. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचल्यानंतर शिष्टमंडळाने ज्लिहाधिकारींची भेट घेऊन पुतळा विटंबनातील गुन्हेगाराला ताबडतोब अटक करावी व कठोरात—कठोर शासन करावे, अशी विनंती केली. पुतळा विटंबना प्रकरणामुळे सारा कोल्हापूर जिल्हा ढवळून निघाला. मोठ्या प्रमाणात दलित सारा एकसंघ झाला.

**कुडित्रे गावातील संघर्ष (१९८०—८१):**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे दलित समाज मोठ्या प्रमाणात जागृत झाला होता. तो आता आपल्या अधिकार व हक्कांसाठी संघर्षाला तयार झाला होता. अशा वातावरणामध्येच दलित पँथर व मासमुव्हमेंटमुळे दलितांना आधार मिळाला होता. कोल्हापूर जिल्ह्यातील दलित आता आपले हक्क व अधिकारासाठी मिळविण्यासाठी सज्ज झाला होता. पण सवर्ण दलितांना त्यांचे हक्क व अधिकार देण्यास तयार नव्हते. यामुळेच कोल्हापूर जिल्हामध्ये दलित सवर्णांमध्ये संघर्ष होत होते. करवीर तालुक्यातील कुडित्रे हे गाव कोल्हापूर पासून वीस मैलावर आहे. कुडित्रे गावातील दलितांना गावची सर्व प्रकारची वेठबिगाराची कामे करावी लागत होती. आता दलित तरुणांना हे आवडत नव्हते आणि त्यांच्या बुद्धीलाही ते पटत नव्हते. परिणामी १९८० ला कुडित्रे गावातील दलितांनी ही वेठबिगारीची कामे करण्यास नकार दिला. यामध्ये धोंडी भास्कर, नामदेव टेलर, तानाजी टेलर, रामचंद्र टेलर ही सगळी मंडळी आघाडीवर होती.

दलितांनी गावकीची कामे बंद केल्यामुळे कुडित्रे गावाने गावची मिटिंग घेवून दलितांना बोलावून घेतले व गावकीची कामे तुम्हाला करावीच लागतील असा दम भरला. अर्थात असे असले तरी आता कुडित्रेचा दलित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे धाडसी झाला होता. त्यांनी आपल्या सर्वांची एकी करून 'आमचे काय व्हायचे ते होवो, पण आम्ही गुलामगिरीची कामे करणार नाही' असे गाववाल्यांना ठणकावून सांगितले. दलितांनी गावकीची कामे करण्यास नकार दिल्याने कुडित्रेच्या पाटील मंडळींनी दलितांच्यावर बहिष्कार टाकून त्यांच्या आर्थिक नाड्या आवळण्याचा प्रयत्न केला. दलितांचा रोजगार बंद केला. यामुळे दलितांची व जनावरांची उपासमार होऊ लागली. शेवटी नामदेव टेलर, तानाजी टेलर, रामचंद्र टेलर हे तिघे मिळून कोल्हापूरला आले व दलित मित्र बापूसाहेब पाटील यांना भेटले.त्यांना गावातली संपूर्ण हकीगत सांगितली. बापूसाहेब पाटील, सर्व हकीगत ऐकून घेतल्यानंतर शांतपणे म्हणाले, तुम्ही घाबरू नका, मी तुमच्या बरोबर आहे. यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील पुरोगामी चळवळीतील नेते, आमदार शंकर धोंडी पाटील, ॲड. अरुण सोनाळेकर, मा. आमदार रवींद्र सबनीस, सुरेश शिपूरकर, दिनकरराव यादव, व्यंकाप्पा भोसले, दत्ता जाधव, आर. बी. कोसंबी, बाबासाहेब वडगावकर, राजा ढाले, रामदास आठवले या मंडळींनी कुडित्रे गावाला भेटी दिल्या व दलितांना धीर दिला. दलित मित्र बापूसाहेब पाटील यांनी जिल्हाधिकारी प्रेमकुमार यांना भेटून कुडित्रेमधील दलितांची कैफियत त्यांच्यासमोर मांडली. पण काँग्रेसचे बडे पुढारी सवर्णांच्या पाठिशी उभे राहिल्यामुळे दलितांना न्याय मिळाला नाही.

शेवटी नाईलाजाने दलित मित्र बापूसाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवार दि. ४/२/१९८१ रोजी कुडित्रे ते कोल्हापूरचे जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा जाहीर केला. मोर्चा दिवशी सकाळी दहा वाजता शंभर जनावरे व साडेतीनशे पुरुष—स्त्री व लहान मुले असा हा लाँग मोर्चा कौल्हापूरच्या दिशेने निघाला. साधारणपणे दोन वाजता मोर्चा कोल्हापूरात दाखल झाला. यावेळी सर्व पुरोगामी व दलित नेते मोर्चामध्ये सामील होऊन, मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आला. मोर्चाच्यावतीने बापूसाहेब पाटलांच्या, नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ जिल्हाधिकारी प्रेमकुमार यांना भेटले व आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. शेवटी जिल्हाधिकारी प्रेमकुमारसाहेबांनी करवीरचे तहसीलदार पळसुले साहेबांना हे प्रकरण मिटविण्याचे आदेश दिले. शेवटी शाहू मराठा बोर्डींगमध्ये याबाबत एक बैठक भरली. या बैठकीला श्रीपतराव बोंद्रेदादा, ज्ञानदेव भुयेकर—पाटील, पी. डी. पाटील, एस. आर. पाटील, वि. रा. भास्कर, कुडित्र्याचे दलित समाजातील नामदेव टेलर, तानाजी टेलर, रामचंद्र टेलर, हिंदूराव कुडित्रेकर, बापूसाहेब पाटील, पांडुरंग भास्कर इ. उपस्थित होते. सवर्णांच्या बाजूने गणपती पाटील, लहू पाटील, रामचंद्र पाटील, राजाराम पाटील, राजाराम साळोखे, इ. प्रतिनिधी हजर होते. सरकाराच्यावतीने करवीरचे तहसीलदार पळसुले साहेब होते.

शेवटी बरीच चर्चा होऊन कुडित्रे गावच्या सवर्ण मंडळींनी आपली चूक मान्य केली. या पुढे गावातील दोन्ही समाजामध्ये सामंजस्य निर्माण करू. अडीच रुपये शेतमजुरी मान्य आहे. दलित समाजाला यापुढे आमच्याकडून कसलाही त्रास होणार नाही असा सरकारी बाँड गाववाल्यांनी लिहून दिला व सुमारे आठ—नऊ महिने जो दलित—सवर्ण संघर्ष सुरू होता त्यावर शांततेत पडदा पडला. या शिष्टाईमध्ये करवीरचे प्रांत पळसुलेसाहेब, तहसीलदार चव्हाणसाहेब, दलित मित्र बापूसाहेब पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बाजावली. मिटींगा झाल्यानंतर सवर्ण व दलित मंडळींनी एकमेकांच्या गळ्यात गळा घातला. सर्वांनी चहा घेऊन गावी निघून गेले. या घटनेपासून कुडित्रे गाव शांत आहे. बापूसाहेब पाटलांच्या सहकार्यातूनच हे यश आपण संपादित करू शकलो हे कुडित्रेचा समाज आजही विसरू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षातच जीवनाची प्रेरणा आणि बापूसाहेबांची साथ यामुळेच कुडित्रेचा दलितसमाज माणुसकीची लढाई यशस्वीरित्या लढू शकला.

**कोल्हापूर शहर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळाप्रकरण (१९८६):**

कोल्हापूर हा शाहू राजांचा जिल्हा आहे. शाहू राजांनी आपल्या काळात आपली संपूर्ण राज्ययंत्रणा बहुजन आणि दलितांच्या कल्याणासाठी वापरली.एवढेच नव्हे तर माणगाव येथे परिषद घेऊन अखिल भारतीय दलितांचा नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घोषित केले. शाहू व आंबेडकरांच्या प्रेरणेने मराठा समाजातील एक तरुण स्वत:ला बौद्ध म्हणून जाहीर करतो. त्याचे नाव आहे माधवराव बागल. याच माधवराव बागलांनी डॉ. आंबेडकर जीवंत असतानाच कोल्हापूर येथे बिंदू चौकात यांचा अर्धपुतळा उभा केला. या पुतळ्याला जेव्हा आंबेडकरांनी पाहिले, तेव्हा डॉ. आंबेडकर म्हणाले, अरे मला काय देव करतो काय?

अशा या पुरोगामी कोल्हापूर शहरामध्ये डॉ. आंबेडकरांचा भव्य पूर्णाकृती पुतळा असावा असे प्रत्येक आंबेडकरवादी आणि परिवर्तनवादी माणसाला वाटत होते. बरोबर याच वेळी १९८६ ला कोल्हापूरचे महापौर म्हणून दलित समाजाचे रघुनाथ बावडेकर होते. बावडेकरांनी डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारण्याचे जाहीर केले. पुतळा उभारण्याचे जाहीर केल्यानंतर पुतळा कोणत्या ठिकाणी असावा. याविषयी वाद सुरू झाला आणि शाहू राजांचा कोल्हापूर जिल्हा किती प्रतिगामी आहे हे दिसण्यास सुरूवात झाली. सुरवातीला हा पुतळा स्टँन्डजवळ बसवावा, असे सूचीत केले. पण काँग्रेस पुढाऱ्यांनी घाईगडबडीने स्व. राजीव गांधींचा पुतळा बसवून आपला जातीयवाद दाखवून दिला. नंतर हा पुतळा शाहू

स्मारकाजवळ बसविण्याचे निश्चित केले. पण तेथे ही याला विरोध झाला. रंकाळा तलावाच्या शेजारी हा पुतळा बसवावा, असेही सूचित केले. पण तेथे श्रीपतराव बोंद्रे व त्यांच्या कार्यकर्त्यांनीच प्रचंड विरोध केला. अशाप्रकारे पुरोगामी कोल्हापूरमध्ये डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला मोठा विरोध झाला.

कोल्हापूर शहरातील हे जातीयवादी राजकारण दलित संघटना जास्तकाळ सहन करणार नव्हत्या. ताबडतोब आर. बी. कोसंबींनी मासमुव्हमेंट व प्रषिक विद्यार्थी संघटनेची मिस क्लार्क बोर्डिंग मध्ये मिटींग बोलाविली. या मिटिंगला आर. बी. कोसंबी, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, प्रा. विनय कांबळे, प्रा. भरत नाईक, प्रकाश हुलस्वार, विद्यार्थी संघटनेचे रमेश जाधव, अशोक हातकणंगलेकर, गौतम आळतेकर, ए. बी. कांबळे, विजय कांबळे इ. कार्यकर्ते उपस्थित होते. या मिटिंगमध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मोठा मोर्चा काढण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे कोल्हापूरात प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा प्रकरणावरून मोठा मोर्चा निघाला. या मोर्चामध्ये कोल्हापुरातील सर्व कॉलेजमधील सुमारे अडीचशे ते तीनशे विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. याचा परिणाम असा झाला की, दे.भ. रत्नाप्पा कुंभारांनी आपले राजकीय वर्चस्व वापरून पुतळा महानगरपालिकेजवळ बसविला व पुतळावादाला पूर्ण विराम दिला. आज हा पुतळा महानगरपालिकेच्या शेजारी दिमाखात उभा आहे. सर्व शहराला व जिल्ह्याला पुन्हा परिवर्तनाचा मार्ग दाखवत आहे. जरी पुतळा महानगरपालिकेजवळ उभारला असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला कोल्हापूरमध्ये जो विरोध झाला तो शाहूच्या कार्याचा अपमान आहे आणि कोल्हापूरच्या सवर्णांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात जातीयवाद टिकून आहे. हे यावरून सिद्ध होते.

**घोटवडेचा संघर्ष (१९८८—९०):**

अस्पृश्यता आणि जातीयता या महाभयंकर नरकयातनेने सारा दलित समाज होरपळत होता. गावगाड्यामध्ये पूर्वाश्रमीचा महार, मांग, चर्मकार व ढोर समाज अजूनही माणुसकीहीन जीवनाचा बळी ठरला होता. याला कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील घोटवडे गावातील दलित सुद्धा बळी पडले होते.

कासारी नदीच्या कुशीत वसलेले सुंदर खेडे म्हणजे घोटवडे होय. परंतु मार्च १९८८ हे वर्ष म्हणजे घोटवडे गावातील चिरस्मरणात राहणारेच ठरले. नैसर्गिक कारणामुळे दलित समाज पिण्याच्या पाण्यासाठी वापरत असलेली पाण्याची विहिर आटली. विहिर आटल्याने दलितांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फारच गंभीर बनला. गावात पराकोटीची अस्पृश्यता असल्याने सवर्णसमाज गाव विहिरीवर दलितांना पिण्याचे पाणी भरू देणे अशक्य होते. पाण्याचा प्रश्न गंभीर निर्माण झाल्यामुळे साऱ्या दलित समाजामध्ये एकूणच अस्वस्थता पसरली होती. अशा वातावरणामध्येच दलित समाजातील वडीलधारी मंडळी व तरुण मंडळी एकत्री आली. यामध्ये सदा कांबळे, वसंत कांबळे, भाऊसो कांबळे, गणपती कांबळे, सरसाबाई कांबळे, यशवंत कांबळे इत्यादींच्या विचाराने असा निर्णय घेतला की, गावच्या विहिरीवर एकजुटीने पाणी भरण्यासाठी जायचे. डॉ. बाबासाहेब, आंबेडकरांनी आपला पाण्याचा हक्क मिळवून दिला आहे, असे भाऊसो कांबळे म्हणताच साऱ्याच्याच अंगामध्ये आंबेडकरी स्वाभिमान सळसळला. सर्वांनी पाणी भरण्याचा निश्चय करून मोठ्या उत्साहात गावच्या वहिरीवर पाणी भरले.

पण पाण्याच्या घागरी भरून परत येत असता गावच्या जमावाने दलितांच्यावर काठ्या व दगडांनी हल्ला करुन, त्यांच्या घागरी चेपून टाकल्या. आपला जीव वाचविण्यासाठी दलित सैरावैरा धावू लागले. ही एक मानव जातीला काळीमा लावणारी घटना होती. विचार करून आता दलित बांधवांनी पन्हाळा पोलिस स्टेशन, तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्याकडे रीतसर तक्रार दिली. आता हे प्रकरण पन्हाळ्याच्या बी. डी. ओ. साहेबांकडे

मिटविण्यासाठी गेले. बी. डी. ओ. साहेब हे प्रकरण मिटविण्यासाठी घोटवडेत आले असता. त्यांच्यासमोरच दलित–सवर्ण वादाला सुरुवात होऊन सवर्णांनी दलित वस्तीवर हल्ला केला. महिलांना सुद्धा मारहाण केली. यामध्ये सरसाबाई कांबळे यांची सून भिकाबाई यल्लाप्पा कांबळे यांना सवर्णामधील काही मंडळींनी काठीने फोडून काढले. सरकारी अधिकाऱ्यांसमोरच हे सर्व घडले होते. आता भाऊसो कांबळे व इतर मंडळींनी सरळ मिस क्लार्क बोर्डिंग गाठले व आर. बी. सरांची भेट घेऊन सर्व हकीकत कथन केली. आर. बी. सरांनी लगेच एक निवेदन तयार करून घोटवडेच्या शिस्टमंडळासह पोलिस प्रमुख रामराव घाटगे यांची भेट घातली व निवेदन सादर केले. घाटगेसाहेबांनी तत्काळ दखल घेऊन घोटवडेच्या दलितांच्या संरक्षणासाठी पोलिस गाड्या पाठविल्या. आर. बी. सरांनीही घोटवडेला भेट देऊन तुम्ही घाबरू नका, काही होणार नाही, आम्ही तुमच्या बरोबर आहोत. प्रशासनाला वाकवून तुमच्यावर अन्याय करणाऱ्यांना अद्दल घडविल्याशिवाय सोडणार नाही. असा धीर देऊन घोटवडेच्या दलितांच्यामध्ये संघर्ष करण्यासाठी आर. बी. नी त्यांना बळ दिले. हा हा म्हणता जिल्ह्यातून दलित कार्यकर्ते, नेते घोटवडे गावाकडे येऊ लागले. यामध्ये दलित पँथर, मासमुव्हमेंट व दलित मुक्ती सेना या संघटनामधील नेते व कार्यकर्त्यांचा समावेश होता. घोटवडे गावातील सवर्णांनीही मिटींग घेतली. गाडगीळ व पाटील असे दोन ग्रुप घोटवडेच्या राजकारणामध्ये होते. घोटवडेचे दलित नेहमी गाडगीळ ग्रुपमध्ये असायचे, पण दलित – सवर्ण संघर्षीत आता गाडगीळ मंडळी सवर्णांच्या बाजूला जाऊन दलितांना त्रास देवू लागली. आता गावात दलित औषधाला ठेवायचा नाही. असा निर्णय दोन्ही पार्टीच्या मिटिंगमध्ये झाला आणि दलितांच्यावर सामाजिक बहिष्कार घातला. आता दलितांना, गाववाल्यांनी सर्वच नाकारल्यामुळे दलितांची उपासमार होऊ लागली. पोलिस तपासही सुरू झाला. जाब–जबाब पंचनामे पोलिसांनी सुरू केले. जिल्ह्यातील दलित बांधवांची घोटवडे गावाकडे मदतीसाठी रिघ लागली. या संघर्षामध्ये जिल्ह्यातील सर्व दलित नेते एकत्र आले. यामध्ये आर. बी. कोसंबी, दत्ता जाधव, मंगलराव माळगे, बाबासाहेब वडगावकर, प्रज्ञावंत गौतम, प्रा. जी. बी. अंबपकर, दगडू भास्कर, प्रकाश हुलस्वार इ. समावेश होता. सुमारे ५०० ते ६०० जणांचा बाहेरून ग्रुप आला होता. या सर्वांनी गावात मोर्चा काढला. या मोर्चावर गाववाल्यांनी तुफान दगडफेक केली. यावेळी डी. एस. पी. माणगावकरांनी हवेत गोळीबार करून दंगल आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. शेवटी जिल्हाधिकारी ए. के. नंदकुमार यांनी दलित नेते, घोटवडेचे दलित, सवर्ण यांची मिटिंग घेऊन हे प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी घोटवडे गावचे दलित–सवर्ण प्रकरण आतून काही मिटले नाही. घोटवडेच्या सवर्णांनी दलितांच्यावर सामाजिक बहिष्कार सुरूच ठेवला. सुमारे दोन वर्षे हा संघर्ष सुरू होता. दलितांनी सुद्धा सर्वांची एकी करून याला स्वाभिमानाने विरोध केला. घोटवडे पासून सुमारे दहा किलो मिटर लांब जाऊन बोरगाव मध्ये रोजगार केला. पण दलित काही मागे हटले नाहीत. शेवटी गाववाल्यांना हळूहळू त्यांची चूक लक्षात आली. आता हळूहळू घोटवडेचे सवर्ण दलितांच्याबरोबर बोलू लागले. त्यांनाही दलितांची गरज होती व दलितांनाही सवर्णांची गरज होती. शेवटी दोघेही एकाच मातीचे होते. हळूहळू दोन्ही समाजातील संघर्ष कमी होऊन पूर्वीसारखे दोन्ही समाजाचे येणे–जाणे सुरू झाले. आज दोन्ही समाज गुण्या–गोविंदाने एकत्र नांदत आहे. अधून–मधून छोट्याशा कुरबुरी होतात पण त्या स्थानिक पातळीवर मिटविल्या जातात. घोटवडेच्या दलितांनी जो दोन वर्षे सवर्णांच्याबरोबर संघर्ष केला त्याचे संपूर्ण श्रेय हे आंबेडकरी चळवळीला जाते.

**मसाई पठार बौद्ध लेणी आंदोलन (१९९२):**

मसाई पठार हे पन्हाळ्यापासून नऊ ते दहा किलोमीटर अंतरावर असून तेथे काही लेण्या आहेत. त्यांना 'पांडव लेण्या' असे म्हंटले जाते. मात्र विविध संशोधकांनी हे सिध्द

केलेले आहे की, या लेण्यांचा पांडवांशी काही सबंध नसून, त्या बौद्ध धर्मीय आहेत. या लेण्यांच्या अभ्यास राजा ढाले करीत होते व जेव्हा जेव्हा ते कोल्हापूर येत तेव्हा तेव्हा ते पन्हाळा किल्ला व पांडव लेण्याविषयी कार्यकर्त्यांच्या बरोबर चर्चा करत असत. १९९२ रोजी राजा ढाले कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले असता सम्यकक्रांती संघटनेचे जिल्हातील बरेच कार्यकर्ते राजा ढालेंच्या बरोबर मसाई पठाराला भेट देण्यासाठी गेले. आता मासमुव्हमेंट बरखास्त करून सम्यकक्रांती संघटनेची स्थापना झाली होती व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मासमुव्हमेंटमध्ये काम करणारे सर्व कार्यकर्ते सम्यक क्रांती संघटनेमध्ये राजा ढालेंच्या नेतृत्वामध्ये काम करू लागले. मसाई पठारावर बौध्द लेण्यांना भेट देण्यासाठी जी मंडळी गेली होती त्यामध्ये आर. बी. कांबळे, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. भरत नाईक,विजय कांबळे, प्रा. अशोक चौकाककर यांचा समावेश होता. मसाई पठारावर पोहचल्यावर त्यांना तेथे लेण्यांची मोडतोड होत असलेली दिसली. पुजाऱ्याला विचारले असता त्यांनी असे उत्तर दिले की, कोल्हापूरचे शिक्षण सम्राट येथे मोठे विठ्ठल मंदिर बांधून मोठा प्रोजेक्ट तयार करणार आहेत व ही सर्व जागा ताब्यात घेणार आहेत. राजा ढाले व कोल्हापूरचे सम्यक क्रांती संघटनेचे कार्यकर्ते कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना भेटून 'मसाई पठारावरची लेणी या बौध्दधर्मीय असून त्यांची सवर्णांकडून होणारी मोडतोड ताबडतोब थांबवावी अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागणार' असे निवेदन दिले.

या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी कोल्हापूरच्या मिस क्लार्क बोर्डिंगमध्ये जिल्ह्यातील सर्व दलित संघटनांची मिटींग बोलविली. या मिटिंगला आर. बी. कांबळे, प्रा. प्रज्ञावंत गौतम, दत्ता जाधव, बाबासाहेब वडगावकर, प्रकाश हुलस्वार, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. भरत नाईक, तुकाराम कांबळे इत्यादी कार्यकर्ते हजर होते. मिटींगमध्ये बरीच चर्चा होऊन डॉ. आंबेडकर विचार व ऐतिहासिक लेणी संवर्धन समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे पहिले अध्यक्ष म्हणून प्रा. प्रज्ञावंत गौतम यांची निवड केली तर सेक्रेटरी म्हणून प्रा. जी. बी. अंबपकर यांची नेमणूक केली. समितीने सर्व जिल्हाभर वारी करून येणारी बुद्ध जयंती ही मसाई पठारावर साजरी करण्याचे सर्व दलित बांधवांना आवाहन केले. पत्रके वाटली. कोल्हापूर—पन्हाळा—मसाई पठारावरच्या रस्त्यावरील गावातील दलितवस्तीमध्ये मिटिंगा घेतल्या. बौद्ध जयंतीचा कार्यकम जवळ आल्याने मसाई पठाराच्या आजूबाजूच्या गावातील सवर्णांची डोकी भडकली. कारण मसाई पठाराची ८०० एकर जमीन ही बौद्धांच्या ताब्यात गेली तर आमच्या गुरांचे काय होईल. त्यांनी मसाई पठारावर होणाऱ्या बुद्ध जयंतीच्या कार्यक्रमाला विरोध दर्शविला. तर समितीने अगोदरच जयंतीचा निर्णय घेतला होता. १६ मे १९९२ रोजी मोठा पोलिस फौजफाटा मसाई पठारावर हजर झाला. या वेळी बंदोबस्ताची जबाबदारी ही डी. वाय. एस. पी. मंडलिकसाहेबांच्याकडे होती. त्यांची व दलित कार्यकर्त्यांची बऱ्यापैकी ओळख होती. अनुचित काही होवू नये म्हणून १४४ कलम पोलिसांनी पुकारले होते. कोल्हापूरातील व आजूबाजूच्या गावातील हजारोंच्या संख्येने दलित समाज जमला होता. तर याला विरोध करण्यासाठी सुमारे दोन तीनशे सवर्ण मंडळी हातात हत्यारे घेवून तयार होती. त्यांना बौध्द लेणींविषयी काही घेणे—देणे नव्हते. तर ८०० एकर जमीन जर दलितांच्या ताब्यात गेली तर आमच्या जनावरांचे काय? हा प्रश्न त्यांच्यापुढे होता.

शेवटी सर्व दलित मंडळी हातात पंचशिल ध्वज घेऊन गुहेत उतरले. सुरवातीला त्रीसरण पंचशिल म्हणण्यास सुरवात केली. आम्ही हात जोडलेले पाहून सवर्णांनी सुद्धा आपल्या हातातील हत्यारे खाली टाकली व त्यांनीही हात जोडले. पंचशिल अनुसरल्यानंतर डॉ. भालेराव सरांनी अहिंसेवर भाषण केले. तर प्रा. जी. बी. अंबपकरांनी आपल्या भाषणामध्ये सुरवातीलाच सांगितले की, आम्ही या ठिकाणी जमीन ताब्यात घेण्यासाठी आलो नाही. जमीन ही सरकारची आहे. आम्ही फक्त या ठिकाणी बौद्ध संस्कृतीचा कार्यक्रम

करण्यासाठी आलो आहोत. सर्वांवर प्रेम करायला बुद्धाने सांगितले आहे. इथून पुढेही भागातील लोकांनी दरवर्षी एकत्र येऊन बुद्ध जयंतीचा कार्यक्रम करू या व अहिंसेचा संदेश देऊ या. अध्यक्षीयभाषण प्रा. प्रज्ञावंत गौतमसरांनी करून त्यांनी सर्वांचे आभार मानले. १९९२ पासून आजअखेर प्रत्येक वर्षाला मसाई पठारावर बुद्ध जयंती शांततेने होत आहे. सवर्ण बंधू सुद्धा यामध्ये सामिल होत आहेत. समितीचे कामकाज हे आज तुकाराम कांबळेसाहेब स्वतंत्रपणे पहात आहेत व प्रत्येक वर्षाला बुद्ध जयंतीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करत आहेत. मसाई पठार बुद्ध जयंतीवरून जो दलित सवर्ण संघर्ष होणार होता तो बुद्धांच्या अहिंसेच्या मार्गाने सुटला व पोलिस प्रशासनाने सुटकेचा निश्वास टाकला.

**शिवाजी विद्यापीठ डी. लिट प्रकरण (१९९२—९३):**

शिवाजी विद्यापीठ पदवीदान समारंभामध्ये ज्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेली असेल, त्याला विद्यापीठाची डी. लिट. ही सन्माननिय पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करते. १९९२—१९९३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटमध्ये विद्यापीठाच्या प्रशासनाने एक ओळीचा ठराव मांडला तो म्हणजे डॉ. एम. आर. देसाई यांचे शैक्षणिक कार्य मोठे आहे. तसेच भालजी पेंढारकरांचे सिनेसृष्टीतील कार्य मोठे आहे. याची दखल घेऊन या दोघांना डी. लिट ही पदवी मिळावी, यानंतर सिनेटमध्ये बरीच चर्चा झाली. उपराकार लक्ष्मण माने यावेळी सिनेटर होते. त्यांनी याला विरोध केला. परंतु या विरोधाला न जुमानता शिवाजी विद्यापीठाने या दोघांना डी. लिट देण्याचे जाहीर केले. ही बातमी वृत्तमानपत्रात येताच दुसऱ्या दिवशी मुलाखत घेण्यासाठी काही वार्ताहर डॉ. एम. आर. देसाई यांच्या घरी गेले. यावेळी डॉ. देसाईंनी आपण रामायण महाभारत या विषयी लिखाण व भाषणे केलेचा उल्लेख केला. याच दरम्यान कोल्हापूरमध्ये शंकराचार्यांनी एका कार्यक्रमात बोलताना जातीव्यवस्थेचे समर्थन करणारे भाषण केले होते. हाच धागा पकडून वार्ताहरांनी मुलाखत घेत असताना डॉ. देसाईंना विचारले की यावर आपली प्रतिक्रिया काय आहे? यावेळी डॉ. देसाई म्हणाले, ‘‘समाजाच्या स्वास्थ्यासाठी चातुर्वर्ण्यव्यवस्था आवश्यक आहे.आजही जातीव्यवस्थेची आवश्यकता आहे’’ दुसऱ्या दिवशी जेव्हा ही बातमी वृत्तपत्रामध्ये झळकली तेव्हा गहजब कोल्हापूरमध्ये झाला. सर्वत्र डॉ. एम. आर. देसाईंच्या निषेधाच्या बातम्या झळकू लागल्या. ताबडतोब डॉ. एम. आर. देसाईंनी वार्ताहर परिषद घेऊन माझ्या बोलण्याचा विपर्यास केलेला आहे. मी असे बोललोच नाही. असे स्पष्टीकरण दिले. पण खवळलेले सर्व आर. पी. आय. गट, सम्यक क्रांती संघटना व अनेक आंबेडकरी विचारांच्या संघटना व तरुण मंडळे ऐकावयास तयार नव्हते. शेवटी आंबेडकरवादी सर्व पक्ष व संघटनांनी शिवाजी विद्यापीठावर भव्य मोर्चा काढला. शेवटी विद्यापीठ प्रशासनाने या दोघांनाही जाहीर केलेल्या डी. लिट पदव्या पाठीमागे घेत आहोत असे जाहीर केले. शेवटी व्यक्ती कोणीही असो शाहू महाराजांच्या नगरीमध्ये जातीव्यवस्थेचे समर्थन करणे किती चुकीचे आहे हे सिद्ध झाले.

**वडणगे प्रकरण (२००५)**

एकविसाव्या शतकातील कोल्हापूरच्या सामाजिक इतिहासाला काळीमा फासणारी घटना म्हणजे मे २००५ मध्ये घडलेले वडणगे प्रकरण होय. सारा भारत २१ व्या शेतकात महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात असताना कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील सवर्ण मंडळींनी मोलमजुरी करणाऱ्या मातंग वस्तीवर अचानक हल्ला करून त्यांच्या प्रपंचाची राखरांगोळी केली. पन्नास वर्षांमध्ये या समाजाने आरक्षणाच्या आधाराने जी प्रगती केली होती ती सगळी नष्ट केली. कोल्हापूर शहर व वडणगेमध्ये फक्त पंचगंगा नदी आहे. वडणगे हे गाव करवीर तालुक्यातील सधन व मोठे गाव आहे. येथे सवर्ण समाजाची लोक वस्ती मोठी

आहे. तसेच दलित समाजाची सुद्धा लोकसंख्या बरी आहे. सर्व समाज गुण्यागोविंदाने एकत्र रहात असताना मे २००५ च्या घटनेने याला कलंक लागला. कारण अजूनही शाहूंच्या कोल्हापूर नगरीतील सवर्णांच्या डोक्यातून जातीय वर्चस्व नष्ट झालेले नाही. गावातील मध्यवर्ती ठिकाणी एका मातंग समाजातील तरुणाने लाँड्रीचा व्यवसाय सुरू केला होता. एका सवर्ण समाजातील तरुणाने मातंग समाजातील तरुणाला असा दम दिला की तू आमच्या आश्रयातून आम्हाला कपडे फुकट इस्त्री करून दिले पाहिजेत. यावरून दोन्ही समाजाच्या तरुणांमध्ये बाचाबाची होवून मातंग समाजाची घरे जाळण्यापर्यंत याची मजल गेली. अनेक घरे व प्रापंचिक वस्तू जाळून टाकल्या गेल्या. दुसऱ्य दिवशी पेपरमध्ये बातमी आली. ही बातमी वाचल्यानंतर अनेक रिपब्लिकन पक्षाचे, दलित महासंघाचे व आंबेडकरी संघटनांचे कार्यकर्ते व नेते यांनी वडणगेला भेट दिली. पोलिसांचा मोठा फौजफाटा वडणगेमध्ये दाखल झाला. याघटनेच्या संदर्भात सर्वच पेपरमधून निषेधाच्या बातम्या आल्या. वडणगे हे गाव करवीर तालुक्याच्या काँग्रेसच्या राजकारणाचा बालेकिल्ला होता. येथे दिग्वीजय खानविलकरांचा व सतेज पाटलांचा गट होता. तसेच शिवसेना व रिपब्लिकन गट सुद्धा कार्यरत होता. जातीय संघर्ष म्हटल्यावर सर्व सवर्णगट एक झाले. दरम्यानच्या काळामध्ये दलित संघटनांनी वडणगेच्या गावगुंडांना अटक करावी व त्यांच्यावर अॅट्रोसिटी दाखल करावी म्हणून मोर्चा काढला होता. याला उत्तर म्हणून सवर्ण मंडळींनी अॅट्रोसिटी कायदा रद्द करावा तसेच वडणगेच्या सवर्णांना अॅट्रोसिटी लावू नका म्हणून प्रती मोर्चा काढला, अशा पद्धतीने या प्रकरणाने उग्र रूप धारण केले. सरकारकडून वडणगेमध्ये जमावबंदी आदेश लागू केला. जिल्हाधिकारी हणमंतराव पवार यांच्याकडून काहीच कारवाई होईना. उलट वडणगे व कोल्हापूरातील सवर्ण संघटनांनी अॅट्रोसिटी कायद्यालाच आवाहन दिले व दलित या कायद्याचा गैरवापर करतात, असे वातावरण तयार केले. हे सर्व सहनशक्तीच्या पलिकडे जात होते व प्रशासन हे सवर्णांच्या बाजूचे आहे हे स्पष्ट जाणवत होते. एरवी कुऱ्हाड मोर्चा काढणारा दलित महासंघ काहीच करू शकत नव्हता.

शेवटी सर्व आंबेडकरी जनता कार्यकर्ते व संघटनांची एक मिटींग टाऊन हॉलमध्ये बोलविण्यात आली. या मिटिंगमध्ये प्रशासनाचा निषेध करून भव्य मोर्चा काढायचा असा निर्धार केला. मोर्चाच्या वतीने पोलिस प्रमुख व जिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्च्यांना निवेदन चिकटवायचे असा निर्णय झाला. कारण घटना घडून महिना झाला तरी पोलिस प्रमुख व जिल्हाधिकारी आरोपींना काहीच करू शकत नव्हते. मिटिंगमध्ये सर्वानुमते प्रा. जी. बी. अंबपकर यांच्याकडे मोर्चाचे नेतृत्व दिले. मिटिंगला आर. बी. कोसंबी, दत्ता जाधव, प्रा. प्रज्ञावंत गौतम, प्रा. विनय कांबळे, बाबासाहेब वडगावकर, प्रा. मच्छिंद्र सकटे, प्रा. सुकुमार कांबळे, लालासो नाईक, शिवाजराव कवाळे, नेताजी कवाळे इ. कार्यकर्ते हजर होते. ठरल्याप्रमाणे जवळजवळ दहा हजार लोकांचा भव्य मोर्चा निघाला. पोलिसांतर्फे जमाबंदीचा आदेश पुकारला होता. पण मोर्चा शांततेने जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीला निवेदन चिकटवले. शेवटी सरकारने मोर्चाची गंभीर दखल घेऊन वडणगे प्रकरणातील आरोपींवर अॅट्रोसिटी दाखल केली. असे असले तरी पंचनाम्यामध्ये पोलिसांनी अनेक कच्चे दुवे ठेवले. आरोपींची संख्या मुद्दाम वाढविली. दोन वर्षांनी निकाल लागून सर्व आरोपी निर्दोष सुटले. मग, प्रश्न पडतो वडणगेमधील मातंग समाजाची घरे कोणी पेटविली?

**समारोप:**

स्वातंत्र्यापूर्वी राजर्षी शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचार, कार्य आणि संघटनातून दलितमुक्तीचा प्रवास सुरु झाला. पुढे भारत स्वतंत्र झाल्यानंतर व भारतीय राज्यघटना अंमलात आल्यानंतर राज्यघटनेने

दिलेल्या सवलतीमुळे कोल्हापूरातील दलित विविध पक्षांमध्ये संघटीत होत होते, संघर्ष करीत होते. यांना फक्त मानवतेचे हक्क आणि अधिकार हवे होते, सामाजिक समता हवी होती. पण सवर्ण समाज अजूनही खोटा जातीय अभिमान घेवून बसला होता. अर्थात बदलास तयार झालेल्या दलित समाजाने स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वेळोवेळी संघर्ष व आंदोलने करून जातीय वाद ठेचण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण कोल्हापूर जिल्ह्यातील जातीयवाद पूर्ण नष्ट मात्र करता आलेला नाही हे मान्यच करावे लागेल.

**संदर्भ:**

१. प्रा. डॉ. कुरणे सी. पी. कोल्हापूर संस्थान आणि कोल्हापूर जिल्ह्यातील दलित चळवळ, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१०, पृ. ३९३

२. प्रा. अंबपकर जी. बी. मानवमुक्तीच्या मार्गावरील प्रवासी, गुलाब अंबपकर, विचारधारा प्रकाशन, कोल्हापूर, मे. २०१५, पृ. १७,१८.

३. कित्ता, पृ. २४

४. भास्कर डी. जी. संघर्षाची गाव, निर्मिती संवाद, प्रा. लि., कोल्हापूर, २०१३.

५. प्रा. अंबपकर, जी. बी. उपरोक्त, पृ. ३४ ते ३६.

६. दै. पुढारी दि. २०/०२/१९८०, पृ. ०३

७. भास्कर डी. जी. उपरोक्त पृ. १०१ ते १०५

८. प्रा. अंबपकर जी. बी. उपरोक्त, पृ. ४२, ४३